**कार्यालय मुख्य बिजोत्पादन अधिकारी,**
**मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र, डॉ. पंदेकृवि., वणी रंभापूर.**

जा. क्र म.प्रा.प्र/तां/369 /२०२२ दि. 13/6/22

## निविदा सुचना

प्रति,

____________________

____________________

____________________

**विषयः** म.प्रा.प्र. वणी रंभापुर कार्यालयातील विविध विभागावरील पेरणी केलेल्या बिजोत्पादन क्षेत्रातील विविध कामे करणे करिता प्रक्षेत्रावर कंत्राटी पुरूष व स्त्रि मजुर पुरविणे बाबत...

**संदर्भ** : संशोधन संचालक कार्यालय जा.क्र. संसं./शा.अ./कं.द/403/2022 दि. 8.6.2022 .

**महोदय,**

उपरोक्त संदर्भीय विषयाचे अनुषंगाने, सन 2022 – 23 करिता म.प्रा.प्र वणी रंभापुर कार्यालया अंतर्गत विविध विभागावर खरीप, रब्बी व उन्हाळी हंगामात विविध पिकांचे बिजोत्पादन कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने विभागावरील पेरणी केलेल्या बिजोत्पादन क्षेत्रातील विविध कामे करणे करिता कंत्राटी पध्दतीने पुरुष/स्त्रि मजुर लावण्या संबंधी चे दर बंद लिफाफयात खाली स्वाक्षरी केलेल्या पत्त्यावर दि. 20/06/2022 पर्यंत कार्यालयीन वेळेत पाठविण्या बाबत खुल्या बाजार पेठेतुन दर मागविण्याचे प्रस्तावित आहे.

करीता खालील दिलेल्या प्रमाणे निविदा मागविण्यात येत आहे.

| अ.क्र | कामाचा तपशिल | विद्यापीठाचे प्रस्तावित दर रू. प्रति हे. | निविदाधारकाचे विद्यापीठ दरापेक्षा कमी दर प्रति हे. |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1 | विविध पिकात खलील प्रमाणे कामे करणे बाबात | | |
| | 1) ताश्या/धसकटे/कचरा वेचणे | 3000/– | |
| | 2) शेणखत भरणे/वाहतुक करणे( 5 टन) | 2500/– | |
| | 3) शेणखत पसरविणे ( 5 टन) | 2000/– | |
| | 4) टोकण पध्दतीने पेरणी (जास्त अंतर) | 2500/– | |
| | टोकण पध्दतीने पेरणी (कमी अंतर) | 3000/– | |
| | 5) पिकातील (बिजोत्पादन क्षेत्रातील) भेसळ काढणे | 1500/– | |
| | 6) पिकातील विरळणी करणे (जास्त अंतर) | 1000/– | |
| | 7) पिकातील विरळणी करणे (कमी अंतर) | 1800/– | |
| | 8) पिकांना पाणी देणे (मोकाट पध्दत) | 1500/– | |
| | 9) पिकांना पाणी देणे (स्प्रिंगलर पध्दत) | 1000/– | |
| | 10) मुगाच्या शेगा तोडणे, शेगा उफळणे, व उधळणे | 6000/– | |
| | 11) ज्वारी बाजरी, मका खुडणे बांधणी करणे व खळयावर जमा करणे | 8500/– | |
| | 12) गहू कापणे बांधणे व खळयावर जमा करणे | 6000/ | |
| | 13) तुर कापणे, बांधणे, जमा करणे, बडवणे व उपन्ने | 9000/– | |
| | 14) भुईमुंग काढणे, शेंगा तोडणे व पिक जमा करणे | 8500/– | |
| | 15) सुर्यफुल,जवस,तिळ,करड,ओवा, काढणी जमा करणे, बदडणे व उफणने | 7500/– | |
| | 16) करडई कापणे बांधणे व गोळा करणे | 6500/– | |
| | 17) हभरा कापणे बांधणे व गोळा करणे | 4500/– | |
| | 18) पिकांची मळणी (थ्रेशर) प्रति क्वी. मजुरासह | 350/– | |
| | यंत्राणे पिक काढणे (कंम्बाईन हारवेस्टर) | 6500/– | |
| | 19) बैल राखणे / चारणे (10 जनावरा पर्यंत) | 392/– | |
| | 20) कापुस वेचणे प्रति (कि.) | 15/– | |
| | 21) कापुस बोजा भरणे प्रति 2 क्वि. | 200/– | |
| | 22) बियाण्याची चाळणी व वनज करणे (प्रति क्वि.) | 30/– | |
| | 23) बियाणे चाळणी, वजन करणे लोडींग व अनलोडींग व त्यासाठी वाहतुक (प्रति क्वी.) | 70/– | |
| | 24) पोत्याची थप्पी लाणे (प्रति क्वि.) | 15/– | |
| | 25) कपाशी जिनिंग करणे (प्रति क्वी. | 150/– | |
| | 26) कपाशी स्वच्छ करणे (प्रति क्वि.) | 150/– | |
| | 27) बिज प्रक्रिया केंद्रातील कामे (टॅगींग बॅगींग, बिजप्रक्रिया इ. (प्रति क्वि.) | 150/– | |
| | 28) वर खत देणे सरत्याने | 1200/– | |
| | 29) वर खत देणे बांगडी पध्दतीने | 2500/– | |
| | 30) वर खत देणे हाताने फेकणे | 1200/– | |
| | 31) फवारणी साधा स्प्रेने | 1500/– | |
| | 32) तननाशक फवारणी (700 लि. पाणी मजुरासहीत) | 2500/– | |

सोबत जोडलेल्या प्र-पत्रात तपशील प्रमाणे दिनांक २०/०६/२०२२ पर्यंत विद्यापीठाणे प्रस्तावीत केलेल्या दरा पेक्षा निविदा धारकांनी कमी दर, कार्यालयीन वेळेत सीलबंद लीफाफामध्ये संबंधीत दस्तावेजसह खालील दिलेल्या अटी व शर्तीस अनुसरून सादर करावे.

**अटी व शर्ती**

1 निविदा पत्रक कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.०० ते दुपारी ४.०० या वेळेस स्वीकारल्या जातील.

2 निविदा / कोटेशन मुख्य बिजोत्पादन अधिकारी यांच्या नावाने सीलबंद लिफाफ्यात पाठवावी.

3 **कंत्राटी पध्दतीने पुरुष/स्त्री मजूर** लावण्याची व्यवस्था संबधित निविदा धारकांनी करावी

4 **कंत्राटी पध्दतीने पुरुष/स्त्री मजूर** लावण्याची संपूर्ण जबाबदारी संबधित निविदा धारकाची राहील.

5 म.प्रा.प्र वणी रंभापूर कार्यालय व विभागावरील असलेल्या संपूर्ण कामे करीत असतांना नुकसान झाल्यास विद्यापीठ प्रशासनाने लागू केलेल्या नुकसान निकषाप्रमाणे नुकसान भरपाई संबधी निविदा धारकाकडून वसूल करण्यात येईल.

6 **कंत्राटी पुरूष/स्त्री मजूर** विभागावर काम करीत असताना नुकसान झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबधित निविदा धारकाची राहील.

7 **कंत्राटी पध्दतीने पुरुष/स्त्री मजूर** लावतांना शासनाने घालून दिलेल्या शासन निर्णय अटी व नियमाचे तंतोतत पालन संबधित निविदा धारकाना करावे लागेल.

8 विभागावर कोणताही वाद विवाद निर्माण झाल्यास कोर्ट कचेरीत न जाता त्याबाबतचा अंतिम निर्णय विद्यापीठ विधी विभागाचे अधिकारी /मा. संशोधन संचालक यांच्या समक्ष मिटविला जाईल व अंतिम निर्णय मा. संशोधन संचालक डॉ. पं.दे.कृ.वि, यांचा राहील व तो सर्वाना मान्य करणे बंधनकारक राहील.

9 विभागावर देण्यात आलेले काम पूर्ण करण्यात यावे, कामा बाबत विभागावरून तक्रार आल्यास किंवा काम सोडून गेल्यास सदर कामाचे देयक काढण्यात येणार नाही.

10 कृषी विद्यापीठ प्रशासन वेळोवेळी निर्देशित केलेल्या नियमाचे पालन करणे निविदा धारकांना बंधनकारक राहील

11 मान्यता देण्यात आलेल्या निविदा धारकांनी/कंत्राट धारकांनी कामा बाबतचा तसेच कंत्राट कर्मचारांण्या किमान वेतन विमा, संरक्षण, भविष्य निर्वाह निधी, कॅशलेश पद्धतीचा अवलंब व इत्यादी सर्व सुविधा पुरविणे या बाबतचा स्पष्ट उल्लेख कामे पुरविता वेळी देण्यात येणाऱ्या ५००/- स्टंप पेपर वर करारनामा मध्ये देण्यात यावा.

12 मान्यता देण्यात आलेल्या निविदा धारकांनी देयक सादर करते वेळी बँक खाते क्रमांक बाबतची संपूर्ण माहिती देयक सादर करते वेळी देण्यात यावी.

13 निविदा सुचनाची छायांकित प्रत कडून निविदा दर सादर करण्यात येऊ नये. तसे केल्यास निविदा रद्द करण्यात येईल.

वरील सर्व अटी व शर्ती मान्य असणाऱ्या निविधा धारकांनीच नमूद कामाचे निविदा सादर कराव्यात.

23/6/2022

मुख्य बिजोत्पादन अधिकारी
मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र
वणी रंभापूर